हुरडा पार्टी
शालेय सहल व हुरडा पार्टी
आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.
मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सेवेकरी भरती
१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१
याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा
पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १८६ वा | बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कोरटकर सारख्या हरामखोरालाच काय यांच्या बापाला ही शिवरायांचा मावळा घाबरत नाही

## फडणवीसांचं नाव घेत कोरटकर देतोय धमकी

### इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी ऑडिओ क्लीप ऐकवली

**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त):-** इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकीचा फोन आल्याची माहिती समोर आली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानावर प्रकाशझोत टाकणाऱ्या बहुचर्चित 'छावा' चित्रपटाबद्दल माध्यमांशी बोलताना सावंत यांनी ब्राह्मण द्वेषी विचार मांडल्याचा आरोप होत आहे. ब्राम्हणवादी लोकांनी छत्रपती संभाजीराजेंना पकडून दिल्याचं वक्तव्य इंद्रजीत सावंत यांनी केलं होतं. इंद्रजीत सावंत यांचे विचार ब्राह्मण द्वेषी असल्याचे म्हणत त्यांना धमकी देण्यात आली आहे. धमकीबाबत साडेसहा मिनिटांचा ऑडिओ खुद्द इंद्रजीत सावंत यांच्याकडून फेसबुकवर शेअर करण्यात आला आहे. त्यानंतर अल्पावधीतच तो सोशल मीडियामध्ये व्हायरल झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर नावाचा एक 'परशूरामी ब्राम्हण' धमक्या देत असल्याचं इंद्रजीत सावंत यांनी फेसबुक पोस्टमध्ये ऑडिओ शेअर करताना म्हटलं आहे.

**मुख्यमंत्र्याचं नाव घेऊन ब्राम्हण देऊ लागले मराठ्यांना धमक्या**

इंद्रजीत सावंत सरांना मिळालेल्या धमकीबद्दल तसेच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेले वक्तव्य ऐकून दुःख झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर नावाचा एक मराठाद्रोही ब्राम्हण धमक्या देत आहे. मराठ्यांना आणि इंद्रजीत सावंत सरांना अशा धमक्या नवीन नाहीत. पण या हरामखोरांचे शिवरायांच्या बद्दलचे विचार किती घाणेरडे आहेत. यांच्या पोटात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचेबद्दल किती विष भरलेले आहे. हे व्हायरल रेकॉर्डिंग वरून स्पष्ट होतंय... ! राज्य सरकारने सदर व्यक्तीवर त्वरित कायदेशीर कारवाई करावी. सावंत सरांच संरक्षण आमच्यासाठी महत्त्वाचं आहे. सर, या कठीण प्रसंगात आम्ही तुमच्यासोबत आहोत. मुख्यमंत्र्यांना आणि सर्व आमदारांना मनपूर्वक विनंती, येणाऱ्या अधिवेशनात इतिहास आणि राष्ट्रीय नायकांचा अपमान करणाऱ्यांवर कठोर कायदा बनवा. यांना आतंकवाद्यांप्रमाणे वागणूक दिली पाहिजे. आपण लोकशाहीवर व संविधानावर विश्वास ठेवतो, अन्य कोणत्याही शाहीवर नाही. त्यामुळे तात्काळ कारवाई होईल व त्या व्यक्तीस कठोर शासन राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री करतील हा विश्वास आहे. नाही केले तर लोकशाही मार्गाने ठोकशाही अवलंबून छत्रपती शिवाजी महाराजांविरोधात गरळ ओकणाऱ्या आणि इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत सरांना धमकी देणाऱ्या त्या हरामखोरला शिक्षा करण्यास आम्ही समर्थ आहोत... !

आपला,
सकल मराठा समाज, सोलापूर




**इंद्रजीत सावंत काय म्हणाले होते ?**

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छावा' सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला. छावा सिनेमाची सर्वत्र चर्चा सुरु असताना इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी या चित्रपटाविषयी भाष्य केलं. छावा सिनेमात इतिहासाचं वेगळ्या पद्धतीनं दर्शन झालं आहे, असं इंद्रजीत सावंत म्हणाले. छावा सिनेमात सोयरा बाईसाहेबांना खलनायक दाखवलं गेल्याचं इंद्रजीत सावंत म्हणाले. अण्णाजी दत्तो हे छत्रपती संभाजी महाराजांचे खरे खलनायक होते, असंही इंद्रजीत सावंत यांनी सांगितलं. विकीपिडीयावर जो खोटा इतिहास लिहिला जातोय तो काढून टाकायला हवा असंही इंद्रजीत सावंत म्हणाले होते.

**इंद्रजीत सावंत यांची फेसबुक पोस्ट काय ?**

"मा. मुख्यमंत्री यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर नावाचा एक परशूरामी ब्राम्हण धमक्या देत आहे. मला अशा धमक्या नवीन नाहीत, पण या हरामखोराचे शिवरायांच्या बद्दलचे विचार किती घाणेरडे आहेत, यांच्या पोटात श्री शिव छत्रपतीं बद्दल काय विष भरलेले आहे हे झोपलेल्या मराठा बहुजनांना समजावे म्हणून हे रेकॉर्डिंग व्हायरल करत आहे. या कोरटकर नावाच्या नागपूरच्या भिक्षूकालाच काय यांच्या बापालाही हा शिवरायांचा मावळा घाबरत नाही. जय शिवराय!!! इंद्रजित सावंत, 25-2-2025 , कोल्हापूर." असे सावंत यांनी फेसबुकवर लिहिले आहे.

## राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्काराचे थाटात वितरण

### महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर यांचा स्तुत्य उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने स्वराज सप्ताह निमित्त राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनीलजी तटकरे साहेब यांच्या संकल्पनेतून महिला आयोग अध्यक्ष तथा महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर, सोलापूर निरीक्षक दिपाली पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहर इ्र जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार,कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान यांच्या नेतृत्वाखाली महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर यांनी समाजातील कर्तृत्वान महिला व महिला सफाई कामगारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते.

सुरुवातीस व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त पोलिस उप निरीक्षक जोगधनकर साहेब व जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय,जय भवानी जय शिवाजी, जिजाऊ माँ साहेबांचा विजय असो अश्या घोषणानी राष्ट्रवादी भवन



कार्यालय दणाणून सोडले होते. यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचा सत्कार सोहळा आनंदी वातावरणात संपन्न झाला. व्यासपीठावर जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, युवक अध्यक्ष सुहास कदम, कार्याध्यक्ष तुषार जक्का, संघटक दत्तात्रय बडगंची, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, सहकार सेल विभाग अध्यक्ष भास्कर आडकी, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, डॉक्टर सेल विभाग अध्यक्ष महेश वसगडेकर, दिव्यांग सेल विभाग अध्यक्ष एम. एम. इटकळे, शहर सचिव दत्तात्रय बनसोडे, महिला आघाडी सचिव अर्चना दुलंगे, कामगार आघाडी विभाग अध्यक्ष मार्तंड शिंगारे, कार्याध्यक्ष संजय सांगळे, सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे, श्यामराव गांगर्डे, शहर उत्तर विधानसभा प्रकाश झाडबुके, राहुल सामल यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात आयोजक संगीता जोगधनकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे साहेब महिला प्रदेशाध्यक्ष तथा राज्य महिला अध्यक्ष रूपालीताई चाकणकर सोलापूर निरीक्षक दिपालीताई पांढरे शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान ज्येष्ठ नेते यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरामध्ये महिला आघाडी अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत असून समाजामधील कर्तुत्वान महिलांचा शोध घेऊन तसेच स्वच्छता दूत यांची संपूर्ण माहिती घेऊन योग्य व्यक्तींचा सन्मान व्हावा आणि यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या उज्वल भविष्यास हा सन्मान पुरस्काराचा उपक्रम राबवला आहे.

मान्यवरांच्या सत्कार समारंभानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यावेळी सत्कार मुतींर्ना भगवे फेटे परिधान करण्यात आले होते.याप्रसंगी पुरस्कार प्राप्त ललिता पेठकर , अंजना राठोड , सुलभा जगझाप, अंजना गायकवाड यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना संगीता ताई जोगधनकर यांनी प्रोत्साहन पर शाबासकीची थाप म्हणून या पुस्तकार दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यानंतर शहर - जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार यांनी त्यांच्या भाषणात शिवजयंती निमित्त व स्वराज सप्ताह निमित्त महिला आघाडी विभागांच्या वतीने घेण्यात आलेल्या स्तुत्य अशा उपक्रमाचे विशेष कौतुक केले. पुरस्कार प्राप्त कर्तृत्वान महिलांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश जाधव यांनी केल.

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने प्रशांत कोरटकर याच्या प्रतिमेला जोडेमार आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या बद्दल गलिच्छ वक्तव्य करून जेम्स लेण्याच्या विकृत लेखनाचे समर्थन करणाऱ्या प्रशांत कोरडकर याच्या प्रतिमेला संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर जोडेमार आंदोलन करण्यात आले. सोशल मीडियावरील क्लिपची चौकशी गुन्हा दाखल करून इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री साहेब यांना निवेदनाद्वारे व ईमेलद्वारे करण्यात आली.

विविध माध्यमांचा वापर करून समाजामध्ये जातीय तीळ निर्माण करण्याचा प्रयत्न वारंवार होत असतो अशा प्रयत्नातून इतिहासाची प्रचंड तोडफोड केली जाते आणि



चुकीचा इतिहास लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत असतो इतिहास अशा प्रयत्नामुळे कधीही बदलत नाही आणि खरा इतिहासच लोकांच्या समोर आणण्याचे काम इतिहास तज्ञ करीत असतात. कोल्हापुरातील इतिहास तज्ञ इंद्रजीत सावंत यांनी ऐतिहासिक दाखल्यावरून केलेल्या काही वक्तव्यावरून नाराज झालेल्या एका व्यक्तीने त्यांना फोन करून प्रचंड शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिली आहे. सदर व्यक्तीने आपल्या नावाच्या आणि जातीचा हे उल्लेख करत सदर धमकी देताना केलेला असणे अत्यंत अशोबनीय आणि निंदनीय आहे. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री आहात आणि या राज्यातील सर्व जाती धर्माच्या लोकांचे प्रमुख आहेत सदर व्यक्तीने दिलेल्या धमकी बद्दल पुढील कारवाई तर होईलच तथापि मुख्यमंत्री म्हणून आपल्या नावाचा स्पष्ट समावेश असल्याने सदर प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी बाजू मांडणे अत्यंत आवश्यक असून याप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी खुलासा करणे आणि इतिहास तज्ञ इंद्रजीत सावंत यांना योग्य ती सुरक्षा पुरवणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा धमकी देणाऱ्याला मुख्यमंत्री यांनी पाठीशी घातल्यासारखे होईल आणि यापुढे आपल्या नावाचा कोणीही गैरवापर करेल तरी आपण त्वरित खुलासा व योग्य ती कारवाई करावी ही मागणी संभाजी ब्रिगेडचे वतीने करण्यात आली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे कार्याध्यक्ष अरविंद शेळके संपर्कप्रमुख छत्र गुण माने दक्षिण तालुका अध्यक्ष शेखर चौगुले संभाजी ब्रिगेड वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम रमेश भंडारे संदीप सरोदे शेखर कंटीकर प्रदीप सरवदे संतोष जत्ती मराठा अमर उपोषण करते प्रशांत देशमुख सिद्धार्थ राजगुरू सतीश वावरे रमेश चव्हाण अकबर मुल्ला आकाश नाईकवाडी आदी उपस्थित होते.

## उजनी धरण उणे ८० टक्के झाल्यावरही पाणीपुरवठा राहणार सुरळीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्याची नवी समांतर जलवाहिनी १५ मार्चपर्यंत पूर्ण होणार आहे. १५ दिवस धरणातून पाणी उपसा करून प्रात्यक्षिक केले जाणार असून, त्यानंतर १ एप्रिलपासून शहराच्या गावठाण भागाला (मूळ शहर) एकदा दोन आणि एकदा तीन दिवसांआड, असे आठवड्यातून तीनवेळा पाणी सोडले जाईल.



त्यादृष्टीने नियोजन केल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

सोलापूर ते उजनी या ११० कि.मी. समांतर जलवाहिनीचे काम सध्या दीड कि.मी. राहिले आहे. आता देगाव नाल्यातून पाइप जोडणी सुरू असून, टेंभुर्णी बायपासजवळील काम देखील पूर्ण झाले आहे. कुरूल-कामती रोडवर (मोहोळ शहराजवळ) पाइप जोडणी सुरू असून, तेथे ५० मीटर काम राहिले आहे. याशिवाय वडाचीवाडी व देवडी येथे दोन शेतकऱ्यांच्या खासगी जमिनीतून जलवाहिनी जाणार असल्याने त्यांना मोबदला देऊन ते काम पूर्ण केले जाणार आहे. तसेच धरणापासून मुख्य रस्त्यापर्यंत ६०० मीटर काम बाकी आहे. आगामी २० दिवसांत ही अर्धवट कामे पूर्ण केली जाणार आहेत. तत्पूर्वी, धरणावरील चार पंपहाउसचे प्रात्यक्षिक यशस्वी झाले असून, विजेची जोडणी देखील करण्यात आली आहे.

## मंगळवेढा, अक्कलकोट मोहोळ तालुक्यात सुरू होणार जलसंधारणाची कामे

### खा. प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून चेन्नईच्या EFI संस्थेचा पुढाकार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकीच्या प्रचारा दरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी मतदारसंघातील दुष्काळी भागातील पाणी टंचाईची समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आता मोहोळ, मंगळवेढा आणि अक्कलकोट तालुक्यात दुष्काळी भागात जलसंधारणाच्या कामाला लवकरच सुरुवात केली जाणार आहे. खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून चेन्नई येथील एन्व्हायरमेंटलिस्ट फाउंडेशन ऑफ इंडिया ( EFI) या संस्थेच्या वतीने सीएसआर अंतर्गत जलसंधारणाचे काम सुरु केले जाणार असल्याची माहिती खासदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला, खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह, E.F.I या संस्थेचे संस्थापक अरुण कृष्णमूर्ती. सी.आदी मान्यवर उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेला संबोधित करताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सोलापूर जिल्हा हा पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील मंगळवेढा, सांगोला, पंढरपूर, मोहोळ, अक्कलकोट तालुक्यातील काही भाग अद्यापही दुष्काळीच



आहे. या भागातील दुष्काळाचा डाग पुसावा यासाठी जलसंधारणाच्या योजना राबवाव्यात अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जात आहे. दरम्यान, गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीचा प्रचार करत असताना मी मंगळवेढा तालुक्यातील 24 गावांचा पाणी प्रश्न सोडवण्यासह अक्कलकोट आणि मोहोळ तालुक्यातील दुष्काळी भागातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी आम्ही केंद्र सरकार, राज्य सरकार यांच्याकडे पाठपुरावा करत आहोत. त्याशिवाय काही पर्यावरणप्रेमी संस्थांच्या माध्यमातून देखील जलसंधारणाची कामे पूर्ण केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या जलसंधारणाच्या कामासाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून चेन्नई येथील पर्यावरणप्रेमी फाउंडेशन ऑफ इंडिया (EFI) ही संस्था सोलापूर जिल्ह्यातील जलसाठे पुनर्संचयित करण्याचे काम हाती घेणार आहे. ही सर्व कामे सामाजिक जबाबदारी अंतर्गत केली जाणार असून यासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी घेतला जाणार नाही. सुरुवातीला या संस्थेकडून सोलापूर लोकसभा मतदार संघातील मोहोळ तालुक्यातील वाफळे, अक्कलकोट तालुक्यातील गाव तसेच मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मी-दहिवडी आणि डोंगरगाव या गावांतील जलसाठे पुनर्संचयित करण्याचे काम केले जाणार आहे.

पर्यावरणप्रेमी फाउंडेशन ऑफ इंडिया (E.F.I) ही वन्यजीव संवर्धन आणि अधिवास पुनर्संचयन संस्था आहे, जी देशातील १८ राज्यांमध्ये कार्यरत आहे. दरम्यान, खासदार प्रणिती शिंदे यांनी मतदारसंघातील दुष्काळावर मात करण्यासाठी या संस्थेचे प्रमुख अरुण कृष्णमूर्ती. सी यांच्याशी चर्चा करून नंतर जलसंधारणाच्या कामाला गती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनतर या संस्थेच्या वतीने सर्वेक्षण करुन वाफले,, लक्ष्मी-दहिवडी आणि डोंगरगाव या गावातील जलसाठे दत्तक घेऊन त्यांचे पुनर्संचयन करण्याचा निर्णय घेतला आहे.

मंगळवेढा तालुक्यातील २४ दुष्काळी गावातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे या सातत्याने प्रयत्न शील असल्याचे दिसून येत आहे. लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधेवेशनात त्यांनी मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांच्या पाणी प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली होती. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळाने मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला तत्काळ मंजुरी दिली होती. तसेच खासदार शिंदे यांनी लोकसभा निवडणुका झाल्यानंतर पहिल्याच अधिवेशनात त्यांनी मंगळवेढा तालुक्यातील पाणी प्रश्नांवर आवाज उठवला होता. आता पाणी फौडेशन, जलयुक्त शिवार या योजनेच्या धरतीवर खासदार प्रणिती शिंदे (पान 2 वर..)

## मनोरमा बँक आर्थिकदृष्ट्या समृद्ध व सक्षम - गांगल

### मनोरमा बँकेच्या नवव्या निंबर्गी शाखेचे ऑनलाईन उद्घाटन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बँकिंग क्षेत्रात काम करत असताना टॅलेंट आणि टेक्नॉलॉजी उत्तम असायला हवी. तरच सहकाराचा पाया मजबूत होतो. आज आर्थिक विषमता दूर करण्याचे काम सहकाराने केले. सहकारी बँक चालवताना नैतिकता महत्त्वाची आहे. तरच शाश्वतपणा आपल्याला टिकवता येतो. मनोरमा बँक आजही आर्थिकदृष्ट्या समृद्ध व सक्षम आहे. सलग सातव्या वर्षीही ह्यमनोरमाह्ने शून्य टक्के एनपीए राखले आहे, असे गौरवोद्गार ठाणे जनता सह. बँकेचे चेअरमन शरद गांगल यांनी काढले.

मनोरमा को ऑप. बँकेची नववी शाखा निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथे नुकतीच कार्यान्वित करण्यात आली. त्याचा ऑनलाईन उद्घाटन सोहळा रविवारी (ता. 23) सायंकाळी बालाजी सरोवर येथे मान्यवरांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते



बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून कॉसमॉस को ऑप. बँकेचे चेअरमन ॲड. प्रल्हाद कोकरे, माजी सह. आयुक्त, निवडणूक प्राधिकरण सह. संस्था पुणेचे संजय खडके, माजी कामगार सह. आयुक्त संभाजी काकडे, मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे, मल्टिस्टेटच्या चेअरमन सौ. शोभा मोरे, व्हा. चेअरमन संतोष सुरवसे, डॉ. सुमित मोरे, कार्याध्यक्षा सौ. अस्मिता गायकवाड सीईओ सौ. शिल्पा कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी चेअरमन श्रीकांत मोरे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा स्मृतिचिन्ह, शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संजय खडके, ॲड. प्रल्हाद कोकरे, आमदार सुभाष देशमुख यांचेही भाषण झाले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मनोरमा बँक निंबर्गी शाखा व मल्टिस्टेट शाखेचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले.

चेअरमन श्रीकांत मोरे म्हणाले, अर्थकारण प्रवाही असले पाहिजे. ग्रोथ ही वाढलीच पाहिजे. यशस्वी व्हायचे असेल तर थांबा नाही. सहकार चळवळ वाढली पाहिजे. मनोरमा परिवार 25 हजार सभासदांचा आहे. यशस्वी उद्योजक, यशस्वी शेतकरी, आदर्श शिक्षकांचा सन्मान परिवाराने केला आहे. 500 कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या गटात अव्वल स्थान मिळाल्यामुळेच बँकेस आदर्श बँकेचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे. यावेळी शिक्षिका सुवर्णा बोरगावकर, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग रजपूत, आदर्श शेतकरी गंगाधर बिराजदार, सीताराम महाराज साखर कारखान्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी राजलक्ष्मी गायकवाड, सौ.व श्री.काळुंगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्याध्यक्षा सौ. अस्मिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सौ. शोभा मोरे यांनीही विचार व्यक्त केले. प्राजक्ता गव्हाणे यांनी प्रास्ताविक केले. व्हा. चेअरमन संतोष सुरवसे यांनी आभार मानले. यावेळी मान्यवरांसह बँकेचे संचालक, कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसराची साफसफाई



## १० टन काढला कचरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या स्वच्छता कार्यास हातभार लावत संत निरंकारी मंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसराची साफसफाई करण्यात आली. या मोहिमेत १०० हून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवत सुमारे १० टन कचरा काढण्यात आला.महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील अंतर्गत रस्ते स्वच्छता मोहीम सुरू आहे. त्यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रमाद्वारे शहरात स्वच्छता करण्यात येत आहे. या स्वच्छता उपक्रमास हातभार म्हणून विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसराची स्वच्छता वतीने करण्यात आली.

यावेळी या मंडळाचे शेकडो हात या मोहिमेसाठी राबले. या परिसरातील सर्व कचरा काढणे, माती गोळा करणे, झाडेझुडपी छाटणे आदी कामे करण्यात आली. त्याचबरोबर तलावाकाठी आलेला कचराही काढण्यात आला. स्वच्छता मोहिमेमुळे हा परिसर चकाचक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रारंभी रवी पवार यांनी उपस्थित सर्व स्वयंसेवक आणि पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. महापालिकेच्या या उपक्रमास सहकार्य केल्याबद्दल आभारही मानले. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अधीक्षक नागनाथ बिराजदार आणि अधिकारी उपस्थित होते.

# डॉ.अरुण अडसूळ यांच्या 'प्रशासकाचा धर्म' पुस्तकाचे प्रकाशन



**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य डॉ.अरुण अडसूळ लिखित प्रशासकाचा धर्म या पुस्तकाचे प्रकाशन माजी सनदी अधिकारी आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांच्या हस्ते महाराष्ट्र प्रबोधिनी अकॅडमी बारामती येथे करण्यात आले.या पुस्तकाची निर्मिती महाराष्ट्र प्रबोधिनी अकॅडमी बारामती व संपादन विजयराज चंदनकर (मा. कृषी अधिकारी) यांनी केले आहे.

प्रशासन ही केवळ अधिकार संपन्न जबाबदारी नाही तर समाज हिताच्या सेवेचा एक नवा संकल्प आहे.

स्पर्धा परीक्षा MPSC व UPSC यामध्ये नव्या निर्णयानुसार या विषयाच्या समावेशाचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या मूल्य संचयातून तयार झालेला दृष्टिकोन नैतिकतेच्या निकषावर तपासणे आहे या दृष्टीने हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे असल्याचे किशोरराजे निंबाळकर यांनी यावेळी नमूद केले. डॉ. अरुण अडसूळ यांनी पुस्तकामध्ये नैतिकतेच्या सिद्धांताची स्पष्ट मांडणी केली आहे.विविध नैतिक तत्त्वज्ञान, लोकशाही मूल्य, सामाजिक न्याय, सार्वजनिक सेवा आणि प्रशासनातील नैतिकतेवर लेखन केले आहे. याशिवाय प्रशासनातील भ्रष्टाचार, पारदर्शकता, उत्तरदायित्व इत्यादी विषयाचे तपशीलवार विश्लेषण केले आहे. यामुळेच हे पुस्तक तरुणाईच्या उज्वल भविष्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरेल असे किशोरराजे निंबाळकर यांनी सांगितले.

या पुस्तकासाठी शुभेच्छा देताना सनदी अधिकारी रमेश घोलप यांनी या पुस्तकामध्ये अडसूळ सरांनी प्रशासकीय दृष्ट्या नैतिकता,सत्यनिष्ठा आणि मनुष्याच्या आचारधर्माचे महत्व यावरती विचार मांडले आहेत. नैतिकतेचे संविधानिक आणि कायदेशीर अधिकार तसेच त्याचे समाजावर होणारे परिणाम याबद्दल सरांनी साध्या आणि सोप्या भाषेत मांडणी केली असल्याचे नमूद केले.

या ठिकाणी मुंबई पोलीस उपायुक्त आनंद भोईटे यांनी या पुस्तकाविषयी मत व्यक्त करताना अडसूळ सरांनी नैतिकदृष्ट्या प्रशासकीय व्यवस्था,त्यांचे कार्य, सार्वजनिक धोरण, निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि प्रशासनातील आव्हानांची सखोल चर्चा केली असल्याची सांगितले.

याप्रसंगी पुस्तकाचे लेखक डॉ.अरुण अडसूळ सर यांनी प्रशासकाने आपली भूमिका पार पाडताना अंतःप्रज्ञेचे मार्गदर्शन घेतले पाहिजे हे सांगण्याचाच पुस्तकाचा मूळ उद्देश असल्याचे सांगितले.

नागरी प्रशासनाद्वारे शासनाच्या कायदे धोरणांच्या निर्मिती प्रक्रिये बरोबरच कायदे धोरणांची लोकाभिमुख अंमलबजावणीत नैतिकता महत्त्वाचे योगदान देते. या अनुषंगाने महाराष्ट्र प्रबोधिनी अकॅडमी बारामती ग्रामीण भागातील सर्वसामान्य होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाच्या शिखरापर्यंत पोहोचवणारी अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपाला आली आहे. आज पर्यंत अकॅडमी मधून 150 विद्यार्थ्यांची प्रशासनात निवड झाली आहे त्याचाच एक भाग म्हणून स्पर्धा परीक्षा चे विचार सर्वदूर रुजवण्यासाठी संवाद स्पर्धा परीक्षार्थींशी हा उपक्रम घेऊन महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.सदस्य अडसूळ सरांच्या उपस्थितीमध्ये आयोजित केले जाणार आहेत.

# मतदारसंघात निधी कमी पडू देणार नाही : आ. खरे



**चळे (कटूसत्य वृत्त):-** मला मतदान करणारेही माझेच वन करणारेही माझेच आहेत. त्यामुळे मी त्या सर्वांचे आभार मानतो, असे सांगत मोहोळ विधानसभा मतदारसंघातील सर्वच गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही आमदार राजू खरे यांनी दिली. यापूर्वीच्या विकासकाम पेक्षाही अधिक पटीने मी मोहोळ मतदारसंघात विकासकामे करून दाखवेन,असा शब्द त्यांनी मतदारांना दिला. ते चळे येथील महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ग्रंथ व व्यासपीठ, वीणा पूजन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर गायकवाड होते. कार्यक्रमास विठ्ठल मोरे, संतोष गायकवाड, उमेश मोरे, उपप्राचार्य सुदाम गायकवाड, भास्करआप्पा गायकवाड, प्राचार्य जे. बी. गायकवाड, भास्कराव मोरे, गोपीनाथ गायकवाड, रमेश मोरे, विजय वाघमारे, श्रीकांत पंडित, लखन वाघमारे, बालाजी बनसोडे, नामदेव मोरे उपस्थित होते. प्रस्ताविक ह.भ.प. रमेश मोरे यांनी केले. आभार राहुल गायकवाड यांनी मानले. यावेळी उमेश सिदवाडकर यांचा उदगीर येथे झालेल्या भजन गायन स्पर्धेत उत्कृष्ट गायक म्हणून पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आ. खरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## जाहीर प्रसिध्दीकरण

नि.६, दि. कि. अर्ज नं.०१/२०२५

**मोहोळ येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सा़ो, यांचे कोर्टात**

१)वैशाली उत्तम काळे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. पाटकुल, ता. मोहोळ,जि. सोलापूर. २)श्री. आनंद उत्तम काळे, वय-२५ वर्षे, धंदा-शेती, रा. पाटकुल,ता. मोहोळ,जि. सोलापूर ३)सौ.रुक्मिणी अनिकेत लवटे, (लग्नानंतरचे नांव ) रक्मिणी उत्तम काळे, (लग्नापुर्वीचे नांव) वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. पेनूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर. ४)सौ. रुपाली अमित पांढरे, (लग्नानंतरचे नांव)४)रुपाली उत्तम काळे, (लग्नापुर्वीचे नांव) वय-२३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कोन्हेरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. ५)सौ. आशा अक्षय वाघमोडे, (लग्नानंतरचे नांव ) आशा उत्तम काळे, (लग्नापुर्वीचे नांव) वय-२१ वर्षे, धंदा घरकाम, रा. पाटकुल, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूध्द**

कोणी नाही..... } **सामनेवाला**

ज्या अर्थी यातील अर्जदार नं.१ याचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे मयत वडिल उत्तम मनोहर काळे हे दिनांक १४/१०/२०२४ रोजी पंढरपूर मोहोळ महामार्ग मोहोळ स्टँडजवळ, मोहोळ,ता. मोहोळ, जि.सोलापूर- ४१३२१३ येथे मयत झालेले आहे. त्यांनाअर्जदार हेच जवळचे व कायदेशीर वारसदार आहेत. त्यामुळेअर्जदारांना मयत उत्तम मनोहर काळे यांच्या मृत्युनंतर त्यांचे नावेअसलेले युनियन बँक ऑफ इंडिया शाखा मोहोळ येथे बचत खातेहोते. सदर अर्जदार नं. १ व २ हे बँकेत गेले असता सदर बँकेने मे.कोर्टाकडुन मयत उत्तम मनोहर काळे यांचे वारस असलेबाबत मे.कोर्टाकडुन तसे वारसप्रमाणपत्र घेवुन यावे असे सांगितल्यामुळे सदरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज वारसदाखला मिळणेसाठी या मे. कोर्टातदाखल केला आहे.

त्या अर्थी सदर मयत उत्तम मनोहर काळे यांचे मृत्युनंतर अर्जदारहे त्यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारस प्रमाणपत्र देणे बाबतकोणाची काहीही हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत अथवा सदर अर्जाची पुढीलतारीख ७/४/२०२५ रोजी अधिकृत प्रतिनिधीमार्फत या मे. कोर्टातहजर राहुन हरकत नोंदवावी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नआल्यास मे. कोर्ट अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देतील त्यानंतरकोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही.ही जाहीर नोटीस कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केलेता. २५/२/२०२५

**लिपीक** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर मोहोळ**

# शिवस्वराज्य सप्ताह निमित्त कर्तुत्वान समाज सेवकांचा पुरस्काराने सन्मान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून स्वराज्य सप्ताह साजरा होत असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष तथा राज्य महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर महिला निरीक्षका दिपाली पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉक्टर शील विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम डॉक्टर सेल विभाग अध्यक्ष महेश वसगडेकर यांनी शिवजयंती आणि राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने रविवारी समाजामधील कर्तृत्ववान समाज सेवकांचा शाल, फेटा, श्रीफळ आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंददादा चंदनशिवे यांच्या शुभहस्ते तसेच व्यासपीठावरील मान्यवरांच्या ईतर सर्वच प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून कार्यक्रमाचे शुभारंभ करण्यात आला. यानंतर समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्वान समाज सेवकांचा शाल, फेटा, श्रीफळ आणि सन्मान चिन्हे देऊन गौरवण्यात आले.

त्याचसोबत महिलांच्या मनोरंजनासाठी संगीत खुर्ची कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता या स्पर्धेत स्मिता पाठक यांनी प्रथम लक्ष्मी आठवले त्यांनी द्वितीय तर विजया स्वामी यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेतील प्रथम विजेत्या स्पर्धकास पैठणी द्वितिय विजेत्या स्पर्धकास सेमी पैठणी व सहभागी स्पर्धकास वस्तू रुपात सप्रेम भेट देण्यात आली.

याचसोबत सोलापूर ते रायगड सायकलवर प्रवास करून आजच्या पिढी समोर वेगळा आदर्श निर्माण करणाऱ्या धैर्य गोरे याचा ही विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला.

प्रस्ताविकेत महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम यांनी त्यांच्या भाषणात रूपालीताई चाकणकर व दिपालीताई पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर महिला आघाडी अतिशय चांगल्या पद्धतीने काम करत असून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा व समाजसेवकांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी पुरस्कार त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, महेश निकंबे, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अमीर शेख, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे, दक्षिण विधानसभा अध्यक्ष श्रीकांत वाघमारे,सहकार सेल विभाग अध्यक्ष भास्कर आडकी, सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे, राजश्री कांबळे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉक्टर विक्रम बसरगी, डॉक्टर बबन कांबळे, पत्रकार संतोष कासे, अमर साळुंखे, अशोक साळुंखे, सुनीता जाधव, डॉक्टर प्रीतम कांबळे, डॉक्टर प्रशांत राठोड, रितेश कांबळे, भीमा रसाळकर, विजय वाघमारे, कल्पना पांढरे, महिला आघाडी सुरेखा घाडगे, शोभा गायकवाड, जाधव, सरोजिनी जाधव, यांच्यासह सर्वच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैराग नगरपंचायत, वैराग

स्थापना १८/०५/२०२१ ता.बार्शी जि.सोलापूर Email- comcvairag1@gmail.com

जा.क्र.न.पं./१८१/२०२५ दि-२५/०२/२०२५

**वैराग नगरपंचायत वैराग**

**निविदा प्रसिद्धीकरण सुचना क्र. १**

मुख्याधिकारी,वैराग नगरपंचायत, वैराग अंतर्गत बांधकाम व आरोग्य विभागाकडील हाती घेतलेल्या विकास कामाचे ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्ताप्राप्त तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-टेंडरद्वारे मागवीत आहे. सदरच्या ई - निविदेमध्ये एकूण २ कामे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि.२५/०२/२०२५ ते दि.१२/०३/२०२५ पर्यंत सायं. ४.00 वाजेपर्यंत असून कामाच्या किंमती बाबत तसेच निविदा किंमत,निविदा स्वीकृती इत्यादीची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

**सही/-**
**(चरण कोल्हे)**
**मुख्याधिकारी**
**वैराग नगरपंचायत वैराग**

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने होणार कर्तृत्ववान महिलांचा गौरव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महिला दिनाच्या निमित्ताने समाजात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना जिल्हास्तरीय राष्ट्रमाता जिजाऊ महिलारत्न पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्याचा मानस पक्षाचे सोलापूर जिल्हा जनरल सेक्रेटरी तथा प्रवक्ते महेश माने यांचा आहे.

सदरच्या पुरस्काराचे हे सातवे वर्ष असून, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा माने यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येईल. यंदाच्या वर्षी आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांनी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन महेश माने यांनी केले आहे. जिजाऊंच्या नावाने महिलांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याला सन्मानित करत समाजासमोर आदर्श निर्माण करून देणे. त्यामाध्यमातून जिजाऊंचे संस्कार, विचार आणि शिकवण समाजातील मनामनात रुजविण्यासाठी हा प्रयत्न आहे. सदरच्या पुरस्कारासाठी इच्छुक महिलांनी 9921325653 / 8329385612 या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन महेश माने यांनी केले. प्राप्त झालेल्या अर्जामधून शैक्षणिक, सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रत्येकी एक महिलेची पुरस्कारासाठी निवड समितीच्या माध्यमातून निवड करण्यात येईल. तरी सोलापूर जिल्ह्यातील वरील क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी अर्ज करावे असे आवाहन महेश माने यांनी केले.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..



(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# ब्रिटिशकालीन संपादित जमिनीचे होणार सर्वेक्षण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर- लोणंद या रेल्वेमार्गासाठी ब्रिटिश काळात सोलापूर व सातारा या दोन जिल्ह्यांतील एकूण ९२२ एकर जमीन संपादित करण्यात आली होती. मात्र, ही जमीन सध्या मूळ मालकांच्या ताब्यात आहे. या रेल्वेमार्गासाठी १९२९ मध्ये संपादित करण्यात आलेली जमीन पुन्हा ताब्यात घेण्याचा प्रयत्न रेल्वे विभागाकडून सुरु करण्यात आला आहे. यासाठी संबंधित जमिनीचे सर्वेक्षण करण्याची मोहीम महसूल व रेल्वे विभागाच्या विशेष पथकाकडून सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुणे दौऱ्यात रेल्वे विभागाच्या या जमिनीचे संपादन करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले आहेत. त्यानुसार मागील दोन दिवसांपासून ब्रिटिशकालीन संपादित जमिनीचे पुन्हा संपादन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. १९२९ मध्ये पंढरपूर-लोणंद रेल्वेमार्गासाठी ९२२ एकर जमीन संपादित केली होती. मात्र, त्यावेळी हा प्रकल्प पूर्ण झाला नाही. १९४९ मध्ये दुष्काळी परिस्थितीत अन्नधान्य उत्पादन करण्यासाठी रेल्वेने ही जमीन महाराष्ट्र सरकारला दिली.त्यामुळे रेल्वे विभागाने जमिनीच्या मोबदल्यात ५ कोटी ६३ लाख २० हजार ४४७ रुपये परवाना शुल्काची मागणी महसूल खात्याकडे केली आहे. या आता रेल्वे विभागाने पंढरपूर-लोणंद हा मार्ग ब्रॉडगेज लाइन म्हणून मंजूर केला आहे. त्यामुळे या मार्गाचे काम करण्यासाठी रेल्वे विभागाने पुन्हा महसूल खात्याकडे जमिनीची मागणी केली आहे. ही जमीन ताब्यात घेण्यासाठी संपादित जमिनीत आढळले सीमांकनाचे दगड रेल्वे विभागाच्या प्रस्तावानुसार १४ गावांपैकी एका गावाची पाहणी महसूल खात्याने केली आहे. या गावात ब्रिटिशकालीन संपादित जमिनीत तत्कालीन काळात रोवलेला सीमांकन दगड व त्यावर सीआर असे लिहिलेले आढळून आल्याचे दिसून आले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी सांगितले.आवश्यक प्रक्रिया सुरू करण्याची मागणी रेल्वे विभागाकडून करण्यात आल्याने त्यानुसार महसूल खात्याकडून विशेष पथकाची नियुक्तीही करण्यात आली असून त्यानुसार संबंधित जमिनीचे अत्याधुनिक यंत्राने शोध घेऊन ती जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पंढरपूर- लोणंद रेल्वेमार्गासाठी पंढरपूर तालुक्यातील इसबावी १६.२० एकर, वाखरी ६०.५ एकर,एकर, भाळवणी ६९ भंडीशेगाव ११३ एकर, धोंडेवाडी २८.७० एकर, माळशिरस तालुक्यातील गुरसाळे २७.७५ एकर, दहिगाव ४४.३ एकर, धर्मपुरी ४०.३ एकर, नातेपुते ५९.७५ एकर, पानीव २६.२७ एकर, फोंडशिरस ३०.३ एकर,मांडवे ३८.५ एकर, विझोरी १७.७ एकर, वेळापूर ८०.६५ एकर इतक्या जमिनीचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उषःकाल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 186

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | 6 | 3 | 4 | | 8 | 1 | |
| | 5 | 1 | 7 | | | 3 | | |
| 4 | 7 | | | 9 | 1 | | | 5 |
| | | | 9 | | 3 | | | 2 |
| | | 2 | | 8 | 7 | | | |
| 1 | | 7 | 2 | | | 6 | | |
| | 8 | 5 | | | 9 | 1 | | |
| | 3 | 4 | | 6 | | | | 9 |
| | 1 | | 5 | | 8 | 7 | | 6 |

